# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांकः22.08.2026** **वारःशनिवार**

---

1. प्रशासकीय स्तरावरील सुधारणांवर सरकारचा मुख्य भर असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. घुसखोरी रोखण्यासाठी आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या रक्षणासाठी देशाच्या सीमांवरील कुंपणाचं काम पूर्ण करणे आवश्यक ; केंद्रीय गृहमंत्री अमित शहा
3. डिजिटल भविष्यासाठी ब्रीक्स देशांमध्ये सहकार्य वाढवण्यावर भर असल्याचं केंद्रीय दूरसंवाद मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांचं प्रतिपादन आणि
4. जागतिक बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद महिला दुहेरीच्या उपांत्य फेरीत दाखल

**<u>पंतप्रधान-अर्थपरिषद</u>**

देशातील सुधारणांचे पर्व ही सक्तीची बाब नसून, सरकारसाठी ती वचनबद्धता आणि दृढ विश्वास असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नमूद केलं आहे. सरकारी धोरणे ही लोकहिताची आणि विकास पूरक तसंच प्रगतीला चालना देणारी आहेत. असंही ते म्हणाले. दिल्लीत काल एका माध्यम समूहाने आयोजित केलेल्या जागतिक नेत्यांच्या मंचाला संबोधित करताना ते बोलत होते. सुधारणांसाठी सरकारने एक स्पष्ट आराखडा तयार केल्याचे सांगून प्रशासकीय स्तरावरील सुधारणांवर मुख्य भर देण्यात आला आहे. देशाचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी भारत धोरणात्मक पातळीवर आधुनिक सुधारणा धोरण राबवत आहे, त्याविषयीचा दृष्टीकोन सरकारने बदलला असल्याचंही पंतप्रधान म्हणाले. जागतिक आर्थिक परिस्थितीवर भाष्य करताना संसाधनांचा शस्त्र म्हणून वापर आणि वाढता अविश्वास या परिस्थितीमुळे नवीन आव्हाने निर्माण होत असल्याचं पंतप्रधान म्हणाले असून, जग भारताकडे आशा आणि विकासाचे उज्ज्वल केंद्र म्हणून पहात असल्याचंही त्यांनी नमूद केलं आहे.

**<u>पश्चिम बंगाल-अमित शहा</u>**

पश्चिम बंगालमध्ये सत्तेवर आल्यानंतर अवघ्या 45 दिवसांत भारत-बांग्लादेश सीमेवर कुंपण घालण्यासाठी सीमा सुरक्षा दल आणि सशस्त्र सीमा दल यांना एक हजार एकरहून जमीन हस्तांतरित केल्याबद्दल केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांचं कौतुक केलं आहे. गेल्या १२ वर्षांपासून सीमेवरील कुंपणासाठीची जमीन देण्याची मागणी प्रलंबित होती असं शहा म्हणाले. घुसखोरी रोखण्यासाठी आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या रक्षणासाठी सीमा कुंपणाचे काम पूर्ण करणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे गृहमंत्र्यांनी सांगितले. बेकायदेशीर स्थलांतराबाबत सरकार शून्य सहिष्णूता धोरण कायम ठेवणार असल्याचंही शहा यांनी स्पष्ट केलं.

**<u>भारत-नेपाळ सीमा</u>**

भारत आणि नेपाळ संयुक्त कार्यगटाच्या14 व्या बैठकीत काल द्विपक्षीय सहकार्यांच्या सर्व पैलूंसह, सीमा व्यवस्थापन आणि सुरक्षेबाबतचे सहकार्य दृढ करण्याच्या वचनबद्धतेचा पुनरूच्चार करण्यात आला. डेहराडून इथं संपन्न झालेल्या बैठकीत भारतीय शिष्टमंडळाचं नेतृत्व केंद्रीय गृह मंत्रालयाच्या सहसचिव पौसुमी बसू यांनी केले तर नेपाळचे नेतृत्व गृहमंत्रालयाचे सहसचिव आनंदा काफले यांनी केलं.

**<u>महाराष्ट्र-जर्मन करार</u>**

महाराष्ट्र आणि जर्मनीतल्या हेसे राज्यांदरम्यान काल गुंतवणूक, नाविन्यपूर्ण उपक्रम, रोजगार आणि कौशल्य विकास या क्षेत्रांतील सहकार्य अधिक दृढ करण्यासंदर्भात एक सामंजस्य करार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि हेसे राज्याचे अध्यक्ष बोरिस राइस यांनी या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या करारामध्ये उद्योग, सेवा क्षेत्र, माहिती तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि परस्पर देशांमध्ये गतीशीलता या क्षेत्रांतील सहकार्याचा समावेश आहे.

**ब्रिक्स-पुणे जयपूर**

ब्रिक्सच्या आयसीटी गटाच्या पांच दिवसांच्या परिषदेचा काल पुण्यात समारोप झाला. केंद्रीय दूरसंवाद मंत्री ज्योतिरादित्य सिंधीया यांच्या अध्यक्षतेखाली काल ब्रीक्स देशांच्या दूरसंवाद मंत्र्यांची बैठक झाली. विश्वासार्ह, नाविन्यपूर्ण, सक्षम आणि सर्वसमावेशक डिजीटल भविष्य घडवण्याचं भारताचं उद्दीष्ट आहे, असं प्रतिपादन सिंधीया यांनी यावेळी केलं. मानवतेचं मूल्य केंद्रस्थानी ठेवून उभारलेल्या ब्रिक्स भागीदारीने तंत्रज्ञानाला मानवी चेहरा आणि मानवी मन दिले पाहिजे असं ते म्हणाले. या बैठकीदरम्यान माहिती आणि दूरसंचार तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकार्यासाठी भारत आणि ब्राझील मध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

जयपूरमध्येही काल ब्रिक्सच्या पर्यटन मंत्यांची बैठक पार पडली. पर्यटन क्षेत्रातील सहकार्य दृढ करणारा जयपूर जाहीरनामा एकमताने या बैठकीत स्वीकारण्यात आला. पर्यटनामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, शाश्वत पर्यटन पद्धती, कौशल्य विकास आणि प्रवास सुलभता या बाबींचा जाहीरनाम्यात समावेश आहे. केंद्रीय संस्कृती आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. आज आंध्र प्रदेशमध्ये ब्रिक्स देशांच्या युवा मंत्यांची आज बैठक होत आहे. तर उद्या क्रीडा मंत्यांची बैठक होणार आहे. या बैठकीच्या अध्यक्षस्थान युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉक्टर मनसुख मांडवीय  भूषवणार आहेत, युवा व्यवहार आणि क्राडी राज्यमंत्री रक्षा खडसे बैठकीत सहभागी होणार आहेत.

**राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार**

महाराष्ट्रातल्या 3 शिक्षकांसह एकंदर 48 शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार काल जाहीर झाले. केजच्या साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या शिक्षिका डॉक्टर कविता गित्ते, नाशिक महानगरपालिकेच्या 18 क्रमांक शाळेतल्या शिक्षिका कुंदा बच्छाव आणि साताऱ्याच्या सैनिकी शाळेतले शिक्षक शिवप्रसाद टिंगरे यांना यंदा या पुरस्कारानं गौरवण्यात येणार आहे. येत्या 5 सप्टेंबर रोजी शिक्षकदिनी त्यांना हा पुरस्कार प्रदान केला जाईल.

**साखर दर**

साखरेचे उत्पादन अपेक्षेपेक्षा कमी झाला असला तरीही देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी पुरेसा साठा उपलब्ध असल्याची ग्वाही सरकारने दिली आहे. साखरेच्या दरात अलीकडे झालेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर, साखरेची पुरेशी उपलब्धत सुनिश्चित कऱण्यासाठी आणि ग्राहकांसाठी दर स्थिर ठेवण्यासाठी सरकारने अनेक उपाययोजना केल्या आहेत. परिस्थितीवर बारकाईनं लक्ष ठेवून असल्याचं ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. अलीकडच्या काळात साखरेच्या किरकोळ दरांमध्ये वाढ होऊन ते 55 रुपये प्रतिकिलो पर्यंत पोहोचले आहेत.

**बीएनपी**

बांग्लादेश नॅशनलिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि पक्षाचे दिग्गज सदस्य मिर्झा फखरूल इस्लाम आलमगीर यांनी काल ढाका इथं 23वे राष्ट्राध्यक्ष म्हणून शपथ घेतली. आलमगीर यांची गुरुवारी झालेल्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत 255 मते मिळवून निवड झाली होती. त्यांनी 'ओली अहमद' यांचा पराभव केला.

**भारत-ब्रिटन**

भारत आणि ब्रिटन यांच्या दरम्यान संयुक्त सराव, प्रशिक्षण आणि क्षमता बांधणीच्या माध्यमातून दोन्ही देशांच्या सशस्त्र दलांमधील द्विपक्षीय देवाणघेवाणा वृद्धिंगत करण्यावर काल दिल्लीत एका महत्त्वपूर्ण चर्चे दरम्यान सहमती दर्शवण्यात आली. संरक्षण सचिव राजेश कुमार सिंग यांनी ब्रिटनच्या संरक्षण विभागाचे स्थायी सचिव जेरेमी पोकलिंग्टन यांच्यासमवेत भारत-ब्रिटन संरक्षण सल्लागार गटाच्या 25 व्या बैठकीचं अध्यक्षस्थान भूषवलं. या बैठकीदरम्यान, दोन्ही देशांनी 'भारत-यूके व्हिजन 2035' आणि 'दहा वर्षांचा संरक्षण औद्योगिक पथदर्शी आराखडा' यांच्या माध्यमातून संशोधन आणि विकासावर विशेष भर देण्यात आला.

**रशिया-ड्रोन**

युक्रेनमधील क्रिव्हि रिह इथल्या एका शॉपिंग सेंटरवर रशियाने केलेल्या ड्रोन हल्ल्यात 16 जण ठार तर 130 हून अधिक जण जखमी झाले आहेत. जखमींमध्ये 22 मुलांचा समावेश असून पाच मुलांसह एकूण 29 जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती तिथल्या लष्करी सूत्रांनी दिली आहे. क्रिव्हि रिह हे युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष वोलोडिमिर झेलेन्स्की यांचे जन्मगाव आहे. सोशल मीडियावर एका व्हिडिओद्वारे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांनी या हल्ल्याचा निषेध केला. युक्रेननेही रशियाच्या तेल शुद्धीकरण प्रकल्प आणि वोल्गोग्राड भागातील लष्करी हवाई तळाला लक्ष्य करण्यात आलं.

**हॉकी**

पुण्यात सुरू असलेल्या 16व्या कनिष्ठ महिला राष्ट्रीय अजिंक्यपद हॉकी स्पर्धेत हरियाणा आणि झारखंड यांनी अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. उपांत्य सामन्यात झारखंड ने मध्य प्रदेशचा तर हरियाणाने छत्तीसगड संघाचा पराभव केला आहे. तिसऱ्या क्रमांकासाठी मध्य प्रदेश आणि छत्तीसगड यांच्यात लढत होणार आहे.

**महिला-हॉकी**

महिला हॉकी विश्वचषक स्पर्धेत दुसऱ्या टप्प्यात काल झालेल्या सामन्यात नेदरलॅन्डस्नं भारताचा 2-0 असा पराभव केला. भारताची यानंतरची लढत ऑस्ट्रेलिया बरोबर होणार आहे. या स्पर्धेत भारतीय संघाला पहिल्यांदाच पराभवाचा सामना करावा लागला आहे.

**कुस्ती-महिला**

स्लोव्हाकिया इथं सुरू असलेल्या 20 वर्षांखालील कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत, काल भारताची 18 वर्षीय महिला कुस्तीपटू काजल ढोचक हिने 76 किलो वजनी गटात सुवर्ण पदक पटकावले. काजलने चीनच्या खेळाडूचा पराभव केला. काजलच्या या ऐतिसहासिक कामगिरीपाठोपाठ भारताच्याच तनू शर्मा आणि सविता यांनीही आपापल्या वजनी गटात रौप्य पदकाला गवसणी घातली.

**दिल्ली-बॅडमिंटन**

बीडब्ल्यूएफ बॅडमिंटन जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत, महिला दुहेरीच्या उपांत्य फेरीत आज भारताच्या ट्रेसा जॉली आणि गायत्री गोपीचंद या जोडीचा सामना चीनच्या अव्वल नामांकित लिऊ शेंग शू आणि टॅन निंग यांच्याशी होणार आहे. भारतीय जोडीने काल चीनच्या जोडीचा पराभव करून उपांत्य फेरी गाठली. या विजयामुळे, या जोडीने भारतासाठी एक पदक निश्चित केले आहे. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत पदक जिंकणारी ही पहिलीच महिला जोडी आहे. तर पुरुषांच्या दुहेरीच्या सात्विकराईराज रँकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांना चीनच्या जोडीकडून पराभव पत्करावा लागला त्यामुळे ही जोडी स्पर्धेतून बाद झाली आहे.

**हवामान**

मध्य प्रदेशात आज मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. आसाम, सिक्कीम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरासह देशाच्या ईशान्येकडील भागांमध्ये उद्यापर्यंत मुसळधार पावसाची शक्यता आहे. दरम्यान, आज सकाळी दिल्ली-एनसीआरच्या काही भागांत पाऊस झाला.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.**